# Maharashtra Pharmacist Association

Unite, Organize and Fight for Right!

## "Aamhi Pharmacist!"

ol. No. I Issue No. 3 May 2009 Rs. 20


## Editorial

During these days of Loksabha Election we have seen many good things happening which definitely keep on purifying and strengthening our democracy. First of all, we have to always bear in mind that India is largest populated democracy in the world. Moreover it is the country having maximum number of youth population and it will remain so in next 30-40 years. This is the biggest advantage for India to develop and stabilise its democratic nature in centuries to follow! Therefore it is no wonder that there is large section of intelligent and educated people in the society who have realized this fact and appealed to youth of this nation to take part in election process, and voting for ideal candidates. We have seen corporate world like TATA group who dared to ask the political candidates questions like what is your job? And qualification? required for contesting the election, through meaningful advertisements appeared in live media. And we have seen famous actor Aamir Khan takes an oath to vote against the people who are anti-India but vote for people who are honest and able to run this country. Also, we have seen many NGO's and democracy loving groups of people like bleedindia.com who appealed general masses through print media to realize the importance of their involvement in election process for protecting the democracy. On top of this, many eminent and senior, honest bureaucrats like T.N.Sheshan, Arun Bhatia, T. Chandrashekhar and the likes have joined the active politics and contested the election. And when we see our ideal beloved hon. Abdul Kalam, ex-President of India appealed on many occasions the teenager students and youth to make career in active politics. So these are the good initiatives by all democracy loving people, which ultimately going to strengthen democracy and make India, a real leader and super power in the world.

Inspite of all these good happenings at the behest of noble people and organizations who love this nation above all, we will see the outcome of this election and get ready to see the same political faces elected either to form the government or sit on opposition benches. The turbulent situation is unlikely to cease and therefore it is imminent reality which should be the cause for every one of us to think upon what is next? And from this day onward if it is not possible for people to get directly involved in active politics, at least they can encourage and motivate the youth colleagues for becoming the ideal diplomats and not mere the politicians, so that this young generation will get involved in active politics and change the fate of drowning democracy. There are bigger challenges like international terrorism, rampant corruption and immense environmental damages, which are collectively, quite sure going to demolish the existence of human beings from this beautiful planet! So it is our moral duty to understand the challenges and courageously attempt to change this ugly face of humanity. After all, apart from our eternal spiritual teachings what else we are required to learn? Every thing is based on morals which is nothing but the foundation of healthy democracy. As a part of this very society and democracy, we pharmacists do have a moral duty to realize the importance of democracy to protect the nation and humanity and thus become active in politics and be the part of this system. If democracy survives, humanity will be there. So awaken dear pharmacists and follow religiously the duty of protecting the democracy in future.

Long live the democracy, nation and humanity!!

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

## संघटनेच्या विकासासाठी महाराष्ट्रातील दौरे व कार्यक्रम

महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशन चे अध्यक्ष श्री. बी.ई.खोमणे व वरिष्ठ नेते श्री. सचिन इटकर यांनी एप्रिल च्या १ व २ ऱ्या आठवड्यात औरंगाबाद, ममुराबाद (जळगाव), फैजपूर, चोपडा, शिरपूर व मालेगाव जि.नाशिक येथील विविध फार्मसी महाविद्यालयांना भेटी दिल्या.

औरंगाबादच्या शासकिय फार्मसी महाविद्यालयामध्ये विद्यार्थी व प्राध्यापक वर्गाच्या सोबत झालेल्या बैठकीमध्ये विद्यार्थ्यांना फार्मसी करिअर संबंधी मार्गदर्शन करण्यात आले. सदरहू भेटीचे वेळी प्रा. डॉ. मौर्य सर, प्रा.मराठे सर , प्रा.डॉ.पुराणिक सर, प्रा.नवले सर व प्रा.साधना शाही हे उपस्थित होते. सायंकाळी यशवंतराव चव्हाण फार्मसी महाविद्यालयात जावून प्राचार्य डॉ. देहघन सरांची सौहार्दपूर्ण वातावरणात भेट घेवून विचारांची आदान प्रदान करण्यात आली.

दि. ८.४.२००९ रोजी ममुराबाद जळगाव येथील फार्मसी महाविद्यालयास भेट दिली तेथे प्राचार्य. डॉ.तळेले सर व प्रा.शास्त्री सरांनी आमचे स्वागत केले. त्यानंतर झालेल्या फार्मसी पदवीच्या विद्यार्थ्यांना श्री.खोमणे व श्री.सचिन इटकर सरांनी मार्गदर्शन केले.

दि. ९.४.०९ रोजी झालेल्या दौऱ्यामध्ये चोपडा येथील फार्मसी महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली यावेळी महाविद्यालयाचे श्री. एस.बी (नाना) पाटील सर तसेच प्रा.गौतम वडनेरे, प्रा.पाटील सर, प्रा.मनिष पाटील, प्रा. रावसाहेब घेगडे, प्रा.तुषार पाटील व इतर मान्यवर हजर होते. सदर बैठकीमध्ये फार्मसी व्यवसायाच्या उत्कर्षासाठी आता सर्व फार्मासिस्ट व फार्मसी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशनच्या माध्यमातून एकत्र लढा देण्यास सज्ज झाले पाहिजे असे ठरले.

त्याचदिवशी शिरपूर येथील श्री. अमरीश पटेल यांच्याशी संबंधीत संस्थांच्या तिन्ही फार्मसी महाविद्यालयांना भेटी दिल्या. तेथील कॅम्पसमधील वातावरण व एकूण महाविद्यालयामधील प्राध्यापक वर्गापासून ते पुरविण्यात आलेल्या शिक्षण सुविधा उत्तम गुणवत्तेच्या वाटल्या. तिन्ही महाविद्यलयांचे प्राचार्य सर्वश्री. डॉ.फुरसुले सर, डॉ.सुराणा सर व डॉ.के.जी.बोथरा सर तसेच प्राध्यापक वृंद सर्वश्री बारी सर, पाटील सर, गोखले सर, रविंद्र सर, बोंडे सर, येले सर यांच्या सर्वांच्या भेटी गाठी झाल्या.

सायंकाळी मालेगाव जि.नाशिक येथील स्वामी विवेकानंद संस्थेच्या फार्मसी डिप्लोमा महाविद्यालयास भेट देवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्यावेळी चांदवड महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. रमेश सु.खर्डे सर, संस्थेचे चेअरमन श्री. सुर्यवंशी सर, प्राचार्य श्री. अन्सारी सर व इतर प्राध्यापक वृंद हजर होता.

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

## दि, २२.०४.०९ रोजी भिवंडी येथे झालेल्या कार्यक्रम

दि. २२.०४.०९ रोजी भिवंडी येथे झालेल्या एका शानदार कार्यक्रमामध्ये संघटनेचे अध्यश्र श्री. बी.ई.खोमणे व सचिव श्री. व्ही.डी.पाटील यांनी जमलेल्या कम्युनिटी फार्मासिस्ट तसेच स्थानिक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन केले. हि सभा यशस्वी व्हावी म्हणून कम्युनिस्ट फार्मासिस्ट सर्वश्री. रियाझ अन्सारी, मुन्नावर अन्सारी, श्री.रफिक अन्सारी, श्री.कासीम, श्री.हरून अन्सारी व प्रा. श्री. मुझम्मिल शेख सर यांनी पुढाकार घेऊन कार्यक्रम अत्यंत यशस्वी केला.

## श्री.संजय ता.पाटील यांची सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, या पदावर पदोन्नती

फार्मासिस्ट जगतातील सर्वांचे लाडके श्री.संजय ता.पाटील यांना महाराष्ट्र शासनाने सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, या पदावर नुकतीच पदोन्नती दिली. या वर्षी ते सहाय्यक आयुक्त म्हणून अन्न व औषध प्रशासनाच्या बृहनमुंबई विभागीय कार्यालयात कार्यरत होते.

श्री. सं.ता.पाटील यांनी दि. ९ एप्रिल २००९ पासून सहआयुक्त पुणे विभाग, अन्न व औषध प्रशासन, पुणे या पदाचा कारभार सांभाळला असून ते पुणे विभागीय अन्न व औषध प्रशासनाचे प्रमुख म्हणून काम पाहतील.

महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशनच्या सभासदांना श्री.पाटील यांच्या पदोन्नतीने मनापासून आनंद झाला आहे. श्री.पाटील फार्मासिस्ट व्यवसायिकांना योग्य न्याय देतील याची खात्री सर्वांना असल्याने अन्न व औषध प्रशासनातील सह आयुक्त या पदावरील त्यांची कारकीर्द अत्यंत यशस्वी ठरेल यासाठी महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशन व प्रत्येक फार्मासिस्टकडून त्यांना हार्दिक शुभेच्छा!

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

# निर्लज्ज औषधी कंपन्या आणि भ्रष्ट व लाचार वैद्यक व्यवसाय यांच्यामुळे भरडला जाणारा फार्मसी व्यवसाय व जनता

गेला तो पुर्विचा जमाना ज्यावेळी जनता डॉक्टरला देव मानायची. खरोखर धन्वंतरी चा अवतार असलेल्या या वैद्यक व्यवसायाकडून राजरोसपणे माणूसकीस काळीमा लावण्याचा व्यवहार बघून मन उद्विग्न होते. सुशिक्षीत असली तरी कुठलीही व्यक्ती आज वैद्यक व्यवसायिकापुढे अज्ञानी ठरते ती त्यांच्या वैद्यकशास्त्राच्या ज्ञानाच्या मक्तेदारीमुळे. डॉक्टरांनी काहीही चुकीच्या चाचण्या केल्या, तपासण्या केल्या, निदान केले व उपचार केले ते आम्हास कळणार कसे की हे बरोबर किंवा चूक आहे म्हणून. आज कुठलीही शासकीय यंत्रणा व वै़द्यकीय व्यवसायिकांच्या संघटना अशा अनैतिक गोष्टीस वाचा फोडण्यासाठी पुढे येत नाहीत. शासनाने यासाठी कायदे केलेत परंतु दुर्दैवाने त्याची अंमलबजावणी होतांना दिसत नाही. त्याच्यापुढे जावून वैद्यकीय व्यवसायिक जाणून बुजून किडनी रॅकेट मध्ये सामील होणार असतील, समाजास अत्यंत विघातक अशा गर्भ लिंग चाचण्या मध्ये स्वतःचे ज्ञान वाया घालवित असतील तर समाजाने काय करावे? वैद्यक व्यवसायिक करित असलेल्या उपचाराबद्दल, शस्त्र क्रियेबद्दल किती रक्कम घेतात त्यावर कुठलाही अंकुश नाही. अज्ञानी रूग्णास परवडत असल्यास अथवा नसल्यास प्रसंगी कर्ज उभारून ही रक्कम अदा करावीच लागते अन्यथा मृतदेहाला घेऊन जाण्यास मज्जाव करण्यात येतो. आणि बहुसंख्यांना तर वैद्यकीय उपचार हे परवडत नसल्याने बहुधा मरण पत्करावे लागते. या मानवी दुर्दैवास काय म्हणावे? नाही म्हणायला आजही धन्वंतरीचा वारसा चालविणारे काही मुठभर डॉक्टर्स शिल्लक असल्याने आपल्या आशा जिवंत आहेत. याबद्दल वैद्यक व्यवसायातील नेतृत्व व त्यांच्या संघटनाकडून समाजास फार मोठ्या अपेक्षा आहेत. या गैरप्रकारास आळा घालण्यास त्यांनीच पुढे यावे ही फोल आशा ठरू नये.

मात्र आज वैद्यक व्यवसायिक व औषधी उत्पादक यांनी संगनमताने औषधासारखे घातक माध्यम वापरून ते सर्वजण फार्मसी व्यवसायिकांच्या व फार्मसी शाखेच्या मुळावर उठल्याने त्यावर आवाज उठविणे आम्ह फार्मासिस्ट ना म्हणूनच मोठे आव्हान ठरले आहे.

आपापसातल्या जीवघेण्या स्पर्धेमुळे औषधी कंपन्यांनी डॉक्टरांच्या सहाय्याने संपूर्ण सामाजास वेठीस धरले आहे. औषधी कंपन्या तसेच वैद्यकीय व्यवसायिक हे कुठलेही तत्व अथवा आचारसंहीता मानायला अथवा ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत. वास्तविक औषधी उत्पादकाने आपल्या विविध औषधी उत्पादनांची संपूर्ण शास्त्रीय माहिती पूरविणे आवश्यक आहे. औषधी कंपन्यांनी मेडीकल रिप्रेजेंन्टेटीव्ह नावाच्या प्राण्यांची मोठी फौज उभी केली आहे त्या विषयी काय बोलावे.या प्रतिनिधींना आवश्यक ती पोपटपंची करून फक्त उत्पादनाचे नाव लक्षात राहिले तरी पुरे अशा तऱ्हेची जुजबी माहिती देण्याचे काम होत आहे. बरेचदा या प्रतिनीधींवर डॉक्टरांना अनैतिकपणे अगदी पेन, पॅड पासून ते परदेशी वाऱ्या घडवून आणण्याचे काम सोपविले आहे. त्यावर कळस म्हणजे काही औषधी कंपन्या अगदी उघडपणे त्यांची औषधे कोणत्या डॉक्टरने किती खपवली यासाठी त्या डॉक्टरमंडळींना रोख पैसे देवू लागल्या आहेत.

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

मध्यंतरी यावर काही समाजसेवी लोकांनी, संस्थांनी व वृत्तपत्रांनी जोरदार आवाज उठविल्यानंतर केंद्र शासनाच्या रसायन व उर्वरक मंत्रालयाच्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांना जाग आली व त्यांनी औषधी उत्पादकांच्या संघटनांच्या प्रतिनीधींना बोलावून या भ्रष्ट व अनैतिकपणे चाललेल्या व उघडपणे गरीब, भोळया व अज्ञान जनतेस लूटण्याच्या प्रकारास केव्हा आळा घालणार म्हणून विचारणा केली. त्यावर निव्वळ औपचारिकतेचा भाग म्हणून या उत्पादक संघटनेच्या प्रतिनीधींनी आम्ही स्वतःच याबाबत आचार संहीता तयार करून सभासंदांनी तिचे पालन करावे असे सांगून वेळ मारून नेली आहे. आज भारतामध्ये औषधी उद्योग हा मूळात जनतेसाठी औषधे रास्त दराने पुरविण्यास कटीबध्द राहीलेला नाही. त्यांच्यामध्ये देखील चार चार संघटना अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत कुठला औषध उत्पादक यांचा सभासद आहे व तो कितपत यांची आचारसंहीता पाळणार हे सरकार काय परमेश्वरालाही कळणार नाही.

औषधी उत्पादकांनी यावर योग्य पावले उचलली नाहीत तर आम्हाला यासाठी वेगळा कायदा करावा लागेल अशी खोटी खोटी दमबाजी  करून देखील औषधी उत्पादक सुधारणार नाहीत हे निश्चीत खरेतर यासाठी वेगळे कायदे करायला नकोच. ज्या कंपन्या अशा अनैतिक व्यवहारामध्ये अडकल्या आहेत अशांचे परवाने त्वरीत रद्द करण्यात यावेत असे अधिकार राज्य औषधी प्रशासनास बहाल करण्यात यावेत. तसेच जे डॉक्टर अशा प्रकारच्या व्यवहारात गुंतले आहे त्यांचे रजिस्ट्रेशन वैद्यकीय परिषदेने रद्द करावे.

आणखी एक परिणामकारक गोष्ट जनहितास्तव करता येवू शकते ती म्हणजे औषधी उत्पादकांनी फिजीशीयन्स सॅम्पल हे डॉक्टर किंवा रूग्णालयास वापरण्यासाठी मोफत देण्याचे त्वरीत बंद केले पाहिजे. बाजारात उपलब्ध असलेल्या नविन औषधांच्या बाबतीत अपवाद करण्यात यावा. तसेच औषध व सौंदर्य प्रसाधने नियमांतर्गत डॉक्टरांनी शेड्यूल के अंतर्गत औषधे त्यांचे रूग्णाकरीता विकण्याची मुभा सन १९६२ साली  प्रथम प्रदान करण्यात आली होती ती मुभा त्वरीत रद्द करणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे औषध व सौंदर्य प्रसाधने नियम, १९४५ मधील नियम ६५(११) (अ) हा त्वरीत रद्द करणे. कुठल्या कंपनीचे औषध रूग्णास दयावे हे फार्मासिस्टनेच ठरवावे कारण तो त्याचा कायदेशिर हक्कच आहे. डॉक्टरांनी फक्त जनरीक नावाने चिठ्ठी लिहून द्यावी. फार्मासिस्ट मग त्याच्याकडे उपलब्ध असलेले उत्तम गुणवत्तेचे व कमी दरातील औषध रूग्णास पुरवतील. असे केल्याने औषधी उत्पादक हे डॉक्टरांच्या जोडीलाच फार्मासिस्ट ला देखील उचित व्यवसायिक भूमिका पार पाडण्यास मदत करतील. यापुढे औषधी उत्पादक, डॉक्टर व फार्मासिस्ट या तीघांचे नैतिक बळ व शास्त्रीय ज्ञान खऱ्या अर्थाने रूग्णांच्या सेवेकरीता वापरल्या जावू शकेल. सर्वात म्हणजे जनतेचे आरोग्य अबाधित राहून त्यांची लूटमार थांबेल अशी आशा वाटते. त्याचबरोबर फार्मासिस्टना     त्यांचा रोजगार मिळेल, ज्यामुळे त्यांची उपजिविका व्यवस्थित चालेल व खऱ्या अर्थाने फार्मसी व्यवसायास भारतामध्ये त्याचे योग्य ते स्थान प्राप्त होईल. आपल्या महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशन ने या अगोदरच या संबंधीच्या लेखी मागण्या केंद्र शासनाकडे केल्या आहेत. कृपया
" आम्ही फार्मासीस्ट !" च्या ८ फेब्रुवारी २००९ रोजी प्रकाशित झालेल्या अंकांमधील या मागण्या सर्व फार्मासिस्ट मित्रांनी अवश्य वाचाव्यात तसेच आपली वेबसाईट www.mahapharma.com
यावर देखील या मागण्या आपणास वाचायास मिळतील, त्या आपण अवश्य वाचाव्यात व आपले मत संघटनेकडे जरूर पाठवावे. याबाबतीत महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशनच्या माध्यमातून आपण सर्व

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

फार्मासिस्ट ना मिळून हा लढा पुढील काळात प्रखरपणे लढावयाचा आहे त्यासाठी सर्वांनी आतापासूनच या विषयाचा सखोल अभ्यास करून लढा देण्यास सज्ज रहावयाचे आहे.

– बी.ई.खोमणे

अध्यक्ष

महाराष्ट्र फार्मासिस्ट असोशिएशन

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

## ओळख एका पुस्तकाची
## वेताळाच्या आरोग्य कथा : लेखक प्रा.रविंद्र रूक्मिणी पंढरीनाथ, एन.एम.आय.एम.एस फार्मसी महाविद्यालय, आग्रा रोड, तापीकाठ, शिरपूर जि. धुळे

श्री. रविंद्र रूक्मिणी पंढरीनाथ हे माझे मित्र आहेत. आपल्या फार्मसी शिक्षण क्षेत्रामध्ये त्यांना सर्वजण ओळखतात. गेली दोन दशके ते एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, जुहू, मुंबई येथे फार्मसी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर मागील एक वर्षापासून नरसी मोनजी इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट (अभिमत विद्यापीठ) च्या  शिरपूर, जि. धुळे येथील फार्मसी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करीत आहेत.

मला माहित आहे की फार्मसी अध्यापनात त्यांच्या शिकविण्याच्या पध्दतीमुळे ते विद्याध्यार्थ्यांमध्ये निश्चीतच  लोकप्रीय आहेत. त्यांच्यामध्ये एक सुप्त फार्मासिस्ट दडला आहे जो फार्मसी व्यवसायास खऱ्या अर्थाने एका शिखरावर नेण्याचे स्वप्न पहात आहे असे मला आम्ही जेव्हा भेटलो तेव्हा वाटायचे. त्यांच्याबद्दल माझ्या मनात वेगळी आदराची भावना मी जपून ठेवली आहे. एका रविवारी दैनिक लोकसत्तामध्ये वैद्यकीय व औषधी क्षेत्रावर आधारीत त्यांच्या " वेताळाच्या आरोग्य कथा " या पुस्तकाचा परिचय वाचला. तेव्हापासून माझ्या मनात कधी एकदा हे पुस्तक वाचीन असे वाटू लागले व मी ते पुस्तक लवकर हाती लागावे म्हणून सरांना निरोप पाठविले. मात्र ही हूरहूर मी व सचिन इटकर सर दि. ९ एप्रिल २००९ रोजी शिरपूर, जि.धुळे येथे त्यांना त्यांचे महाविद्यालयात भेटलो तेव्हा संपली. रविंद्र सरांनी ते पुस्तक माझ्यासाठी काढून ठेवले होते व आवर्जून मला दिले. हा आनंद माझ्यासाठी फार मोठा होता.

त्यांचा निरोप घेऊन आम्ही पुण्याकडे यावयास निघालेल्या प्रवासाअंतर्गत हे पुस्तक मी अधाशासारखे एका दमात वाचून काढले. व माझा आनंद खरोखर मी सचिन इटकर सरांबरोबर शेअर केला. औषध उद्योग जगतामधील काळ्याकुट्ट बाजू, वैद्यक क्षेत्रामधील अनैतिकतेवर आधारलेल्या व लोकांच्या आरोग्याशी त्यांनी मांडलेला खेळ बघून मन लगेचं उद्विग्न झाले. त्यातच भर म्हणून आमच्या व्यवसायामध्ये शिरलेल्या अज्ञानी लोकांनी ज्यांना औषधे विकणे ही आपली मक्तेदारी आहे असे समजून प्रत्यक्ष फार्मसी व्यवसायास ग्रहण लावले त्या सर्वांबाबत मनात प्रचंड चिड निर्माण झाली.

लोकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या औषधी कंपन्या, वैद्यक क्षेत्रातील मंडळी काही औषधी विक्रेते इत्यादींनी मिळून एक अतूट साखळी त्यांचे आपापसातील हितसंबंध जपण्यासाठी निर्माण झाल्याचे मी आणि आपल्यातील अनेक सहकारी यांना चांगले ठावूक आहे. ही मंडळी एकत्र मिळून असहाय रूग्णांना व ग्राहकांना लूटण्याचा पध्दतशीर खेळ खेळत असून आपल्या तुंबड्या भरण्याचा उद्योग करीत आहेत. यांच्या या समाज विघातक वागण्यामुळे आपला फार्मसी व्यवसाय हा धोक्यात आला आहे. या धोक्यापासून आपल्या व्यवसायास

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

वाचविण्यासाठी आता प्रत्येक फार्मासिस्टला कंबर कसून उभे रहायलाच पाहिजे, अन्यथा फार्मसी व्यवसाय हा भारतातून नामशेष झाल्याशिवाय राहणार नाही.
अशा गैरव्यवहाराबाबत श्री.रविंद्र  सरांनी या पुस्तकातील विविध आकर्षक व चित्तवेधक लेखाद्वारे आपल्यासमोर वैद्यक विश्व व औषधी उद्योगाचे वास्तविक चित्र उभे केले आहे व त्यांच्यापरीने त्यांनी सखोल व मार्मिक विवेचन करून आम्हा सर्वांस अंतर्मुख करण्यास भाग पाडले आहे आणि काही तरी चांगले करून दाखविण्यास उत्तेजीत केले आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे कमी आहेत.

औषधी कंपन्या नको असणाऱ्या औषधांच्या व तत्सम वस्तूंच्या मोठमोठ्या जाहिराती करून, अव्वाच्या सव्वा किंमती आकारून त्या ग्राहक रूग्णांच्या माथ्यावर मारतात व असे करतांना निर्लज्जपणे त्या उत्पादनाविषयी खरी माहिती सांगत नाहीत व ज्याच्या अभावाने ग्राहकास फायद्यापेक्षा नुकसान अधिक संभवते तेव्हा अशा कंपन्यांना कोणता धडा शिकवावा? असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचे उत्तम उदाहरण  म्हणजे कानातील मळ साफ करावयासाठी कापूस लावलेल्या प्लास्टीकच्या काड्या, लोमोटील सारखे औषध, टक्कल पडू नये अथवा पडल्यानंतर पुन्हा केस उगवायचा खोटा दावा करून ग्राहकांना फसविण्यासाठी तयार केलेली तेले, सर्दी औषधाने बरी होत नाही तरी त्यावर उत्तम इलाज म्हणून व्हिक्स वेपोरब सारखी अनावश्यक औषधे किती गुणकारी आहे असे खोटे खोटेच भासविणाऱ्या जाहिराती, गोरेपणावर अक्सिर इलाज म्हणून अनेक प्रकारची अनावश्यक औषधे व सौंदर्य प्रसाधने, गोड व मोहक पण तद्दन खोट्या जाहिरातीद्वारे लोकांना फसविण्यासाठीच तयार केलेली उत्पादने, पातळ द्रव्यरूपी व्हिटॅमिन्स व खनिजद्रव्य घटक असलेली टॉनीक्स ज्याच्यापासून फायदा कमी व नुकसान होण्याची शक्यता जास्त अशी औषधे, शरीर वर्धके व वृध्दीप्रेरक म्हणून खपविण्यात येणारी अनाबोलिक स्टेरॉईडस्     उत्पादने, भूक वाढविणारी सायप्रोहिप्टाडिनसारखी घातक औषधे, टूथ पेस्ट सारख्या अनावश्यक गोष्टीबाबत अनेक खोटे दावे करून त्या खपविण्यासाठी प्रचंड खर्च करून करण्यात येणाऱ्या जाहिराती, कृशपणावर इलाज म्हणून वा लठ्ठ होण्यासाठी हानिकारक औषधांचे उत्पादन व त्यांचा खप, उंची वाढविण्यासाठी वापरण्यात येणारी औषधे, ग्रोथ हार्मोन्ससारखी औषधे व त्यांचे दुष्परिणाम, वजन कमी करावयासाठी उपलब्ध असलेली असंख्य हानिकारक औषधे, क्रिडाक्षेत्रात नैपुण्य मिळविण्यासाठी वापरण्यात येणारी उत्तेजक औषधे तसेच अनेक असुरक्षित आयुर्वेदीक औषधे, कारण नसतांना इंजेक्शन वापरण्याचा डॉक्टरांना पडलेला मोह, आयोडीनयुक्त मीठ वापरण्यासाठी शासनाचा दुराग्रह व त्यामुळे होणारे नुकसान, इत्यादीं प्रकारावरील लेख आपणास अंर्तमुख होण्यास भाग पाडतात.

वैद्यक क्षेत्रातील मंडळी औषधांची खरी माहिती रूग्णांना सांगत नाहीत. कित्येकदा त्यांना स्वत:ही त्याची माहिती नसते. औषधी कंपन्या ही माहिती अनेकदा दडवून ठेवतात, त्यामुळे रूग्णास प्रसंगी प्राण गमवावे लागतात. औषधी कंपन्यांची हजारो ट्रेड नावाने खपविण्यात येणारी औषधे, ज्यांच्या नावातील साध्यर्म्यामुळे रूग्णास मोठे नुकसान पोहोचू शकते प्रसंगी मृत्यूदेखील ओढू शकतो, त्या बद्दलची जुजबी माहिती औषधी कंपन्यांचे प्रतिनीधी नुसती पोपटपंची करून डॉक्टरांस देतात. त्यांच्याबद्दलची पूर्ण माहिती ते कधीच डॉक्टरांना पुरवित नाहीत व डॉक्टर मंडळींना देखील पूर्ण माहिती करून घेण्यात वेळ नाही व रस नाही.

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

औषधी कंपन्यांच्या व डॉक्टर मंडळींच्या संगनमताने प्रत्यक्षात काय चालले आहे या बद्दल च्या सर्व गोष्टी छान समजावून सांगितल्यानंतर रविंद्रसरांनी भारतामध्ये व भारताबाहेरील हाताच्या बोटावर मोजावे अशा जागरूक मंडळींनीं व वैद्यक व्यवसायिकांनी औषधांच्या क्षेत्रामध्ये अनेक चांगल्या गोष्टी करून दाखविल्या आहेत. अशा मंडळींमध्ये डॉ.जफरूल चौधरी यांनी बांगलादेशमध्ये यशस्वीपणे राबविलेले औषधी व आरोग्य धोरण, गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी क्षेत्रामध्ये कार्य करित असलेले डॉ.बंग दांपत्य, श्री.रामदेवबाबा, डॉ.वैद्य, डॉ.फडके, बडोदा येथील लो कॉस्ट ही संस्था यांचा आवर्जून उल्लेख केला आहे. त्यांच्या तर्फे राबविण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या समाजपयोगी व आरोग्य सुधारावे म्हणून यशस्वीपणे हाती घेतलेल्या उपक्रमाविषयी मार्गदर्शक व प्रेरणा देणारी माहिती वाचकांना करून दिली आहे. या मंडळींच्या कर्तृत्वामुळे आम्हा फार्मासिस्ट ना देखील काही प्रेरणा निश्चीत मिळाली आहे व आम्ही देखील आमचा हातभार अशा समाजपयोगी उपक्रमास लावला पाहिजे अशी भावना आपल्यामध्ये निर्माण केली आहे. याचबरोबर आरोग्य क्षेत्रामध्ये ॲलोपॅथी च्या बरोबरीने आर्युवेद, निसर्गोपचार, योग अभ्यास व होमिओपथी यांचे देखील उल्लेखनीय योगदान असल्याचे आपल्या सर्वांच्या नजरेस आणून दिले आहे.

औषधांचा योग्य वापर (Rational Use of Medicine) या जागतिक आरोग्य संघटनेच्या संकल्पनेस आपण सर्वांनी दाखविलेली उदासिनता ही त्या मुळ उद्देशास न्याय न देता उलट लोकांना अनावश्यक औषधे देण्यास वैद्यक व्यवसायिक प्रवृत्त करीत असण्याचे चित्र आपणास पहावयास मिळते.
तसेच आपल्या देशामध्ये औषध प्रशासन यंत्रणा ही अतिशय कमकूवत असल्याने या संस्थेकडून सामाजिक हिताची कित्येक कार्य अजून हाती घ्यावयाची बाकी आहेत. त्यामुळे लोकांना महागडी औषधे, अनावश्यक औषधे, खोट्या व भूलथापा मारून केलेल्या जाहिराती व त्यामुळे ग्राहकाची होणारी लूट हे सहन करावे लागणार आहे व तोपर्यंत औषध उत्पादक, वैद्यकीय व्यवसायिक व औषध विक्रेते जनतेची लूट सुरूच ठेवणार आहोत हे उघड आहे. त्यातच आता भारतामध्ये क्लिनीकल ट्रायल्स चे पेव फुटले असल्याने व त्यावर शासनाचा काहिही अंकूश नसल्याने त्यात कार्यरत असलेल्या कित्येक संस्था या औषधी कंपन्यांना हवी ती खोटी नाटी माहिती क्लिनीक ट्रायल्सच्या नावाखाली नाटक करून पुरवतील व त्याचे दुष्परिणाम आपण हताशपणे पहात राहू. या परिस्थितीवर मात करण्यासाठी श्री. रविंद्र सरांनी फार्मसी व्यवसायाकडून फार मोठ्या बदलाची व योगदानाची कल्पना मांडली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आजही फार्मासिस्ट व्यवसायिक हा औषधी निर्मीती व विक्री मध्ये आपली चांगली प्रतिमा टिकवून आहेत. तथापी त्यांची व फार्मसी व्यवसायाची ओळख समाजास अजून पूर्णपणे पटावयाची आहे. व्यवसायिक प्रतिमा बनण्यासाठी केवळ समाजपयोगी काम करणे पुरसे नसते तर ते समाजाच्या दृष्टीस पडावे लागते अशी त्यांची धारणा आहे. त्याचबरोबर फार्मसी व्यवसायातील सदस्यांनी वा त्यांच्यातील नेतृत्वाने समाजा जवळ जाण्याचा प्रयत्न केला नाही. वास्तविक औषधी विक्रेत्यांच्या रूपात फार्मासिस्टना ही संधी होती पण सकुंचित स्वार्थापोटी त्यांनी ती घालवली. म्हणून आजच्या काळातील नवीन आव्हाने स्विकारत व्यवसायिकतेवर, कौशल्य वाढवण्यावर व मुख्य म्हणजे व्यावसायिक नितीमूल्ये जपण्यावर भर दिला तर समाजात फार्मसी व्यवसायिकांना नक्कीच गौरव प्राप्त होईल. एरवी डॉक्टर्स सकट सर्व व्यवसायिकांच्या संघटना ह्या लुटारूंच्या टोळ्या बनल्या आहेत, ह्या सर्व सामान्यांच्या मताला पुष्टी मिळेल.

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

श्री. रविंद्र सरांनी या पुस्तक रूपाने आपल्यासमोर आरसा ठेवून आपली वास्तविक प्रतिमा ओळखण्यास भाग पाडले आहे. खरेतर आपल्यातील कित्येक सहकारी आरोग्य क्षेत्रामध्ये चाललेल्या अनैतिक गोष्टी, औषधी उद्योगांची कटकारस्थाने व काही औषधी विक्रेत्यांचे गुंतलेले हितसंबंध या विषयी जाणून आहेत. त्याचप्रमाणे आपल्या व्यवसायास या संकटातून बाहेर काढण्याचा संकल्प करीत आहेत. अशा वेळी श्री. रविंद्र सरांनी म्हणजे आपल्या एका फार्मसिस्ट सहकाऱ्याने हे चित्रण लिखीत स्वरूपात आपल्यापुढे ठेवून आपल्यावर अनंत उपकार केले आहे. वास्तविक हे पुस्तक प्रत्येक फार्मसिस्ट ने आपल्या संग्रही ठेवले पाहिजे. त्याचे मनन व चिंतन केले पाहिजे. प्रत्येक फार्मसी महाविद्यालयामधून प्राध्यापकांनी या पुस्तकाची आवड प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात करून दिली पाहिजे. तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या सर्व कार्यालयात हे पुस्तक उपलब्ध पाहिजे आणि सह आयुक्त, सहाय्यक आयुक्त व औषध निरीक्षक यांनी हे पुस्तक वाचून आपले प्रशासन मजबूत करण्यासाठी जे जे करणे आवश्यक आहे त्यासर्व गोष्टी तत्परतेने व त्वरीत केल्या पाहिजे कारण हे त्यांचे प्रथम कर्तव्य आहे.

शेवटी माणसाच्या हावरट व स्वार्थी स्वभावामुळे अशा हानिकारक गोष्टी, इतर क्षेत्राबरोबरच आरोग्य क्षेत्रामध्ये घडत असतील तर त्यास तोडीस तोड उत्तर असल्याचेही विश्वासपूर्वक व अश्वासनात्मक आधार देत श्री.रविंद्र सर आम्हाला आशेचा किरण दाखवितात व चांगले बदल घडून येतील का? या शंकेस महात्मा गांधींच्याच शब्दात उत्तर देतात - " करके देखो ! " आणि म्हणून श्री.रविंद्र सरांनी हे पुस्तक
" वंडखोरी व नवनिर्मीतीच्या मुळाशी असणाऱ्या प्रश्न विचारण्याच्या व उपस्थित करण्याच्या प्रवृतीस " अर्पण केले आहे.

श्री. रविंद्र सरांच्या अपेक्षा आम्ही सर्व फार्मासिस्ट मिळून व एकत्रितपणे लढा देवून खात्रीपूर्वक पूर्ण करू शकतो यावर आपल्या सर्वांचा विश्वास आहे. चला तर मित्रांनो उठा. संघटीत व्हा व लढण्यासाठी सिध्द रहा.

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com



# Dr. Sanjay S. Toshniwal has secured first position all over India in Patent Agent Examination, December 2008

**Dr. Sanjay S. Toshniwal has secured first position all over India in Patent Agent Examination, 2008 conducted by Indian Patent Office. As per result notification published by patent office he secured 77.66 % marks. A total no. of 567 students appeared for the exam from all over India.**

To give background information, one needs to pass the India Patent Agent Examination to become a Registered Patent Agent in India. This is a professional qualification and a life long qualification. Ministry of Commerce and Industry (Govt. of India) conducts the Patent Agent or Patent Attorney Examination through Patent Offices at New Delhi, Mumbai, Kolkata and Chennai.

Practice as a patent agent includes any of the following acts, namely:
a) Applying for or obtaining patents in India or elsewhere on behalf the applicant;
b) Preparing patent specifications or other documents for the purposes of this Act or of the patent law of any country for the applicant;
c) Giving advice other than of a scientific or technical nature as to the validity of patents or their infringement

In India the Patent Registration is done under the Indian patent act 1970. The registration can be done with the help of a patent attorney or patent agent, authorized by the Indian patent office. Registering a Patent is a specialized activity that demands lot of domain expertise. It involves conducting a search for prior art in various patent and scientific databases. The claim writing and specification writing is the heart of the patent document and the claims have to be drafted as per the prevalent rules to get adequate protection for the invention. Therefore a patent agent writes and files patent applications, helps to identify patentable subject matter, and writes responses to Office Actions arguing the patentability of an invention/patent application.

Dr. Toshniwal is an pharmacy professional having an 8 years of academic experience and working in industry since last three years in the field of Intellectual Property-Patents.

We congratulate Dr. Sanjay Toshniwal for his grand success and wish he will bring many such occasions in his enterprising career.

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

**To,**
**The President**
**Maharashtra Pharmacist Association**
**3, Gr. Fl, Kiran Society, Dada Patil marg,**
**Naupada, Thane 400 602**

We would like to advertise in you esteemed magazine, "Aamhi Pharmacist!" in format as indicated below;

| | |
|---|---|
| 1. Full page | Rs. 10,000/- per insert |
| 2. Half page | Rs. 5,000/- per insert |
| 3. Quarterly page | Rs. 2,500/- per insert |
| 4. Bottom space of the page (Approximately qtr. page) | Rs. 3,000/- per insert |
| 5. Classifieds (Only for jobs) | Rs. 500/- for 30 words<br>Rs. 100/- for next 10 words. |

We also desire to subscribe to "Aamhi Pharmacist!" for One/Two/Three years

**Issue subscription rates:**

| | | **For Institutes** | **For members of MPA** |
|---|---|---|---|
| One year | (12 Issues) | Rs. 1000/- | Rs. 200/- |
| Two year | (24 Issues) | Rs. 2000/- | Rs. 400/- |
| Three year | (36 Issues) | Rs. 3000/- | Rs. 600/- |

Name: Designation:

Company Name:

Address:

Tel. No: Mobile No: Email:

Cheque/D.D No: ____________________dated______________________________

Drawn on (Bank Name) __________________________________________________

In favour of "**Maharashtra Pharmacist Association**"

Date: Signature:

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

Printed, published and edited by Shri. B.E.Khomne Published from 103, Vakratunda, 1st Fl., A-wing, Bhakti mandir Rd., Panchpakhadi, Thane 400 602
Email: bekhomne@yahoo.co.in Tel: 25341613 Mob: 9322235306 and printed from M/s Maharashtra Printers and Advrtisers, Classic Plaza, Gokhale Road, Naupada, Thane 400 602 Te: 25408299

View expressed in the articles of "Aamhi Pharmacist!" are those of authors and not of editor.

Important: while reasonable care is taken prior to publication of an advertisements. However "Aamhi Pharmacist!" will not be responsible for contents of advertisements, nor for any loss or damages incurred as a result of transactions with the persons advertising in this issue. It is therefore necessary to make inquiries before sending any money or entering into any agreements on an advertisement in any manner whatsoever.

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

# MAHARASHTRA PHARMACIST ASSOCIATION

3,Kiran Society,Gr.Floor,Dada Patil Marg,Naupada,Thane-400 602.Ph.No.022-25341613.
E-Mail-admin@mahapharma.com Website-www.mahapharma.com

## Membership Form

**Note:Please sign within the box, in BLACK ink only.**

Affix Photograph

Name:

Date of Birth: Gender: Male/Female Blood Group:

Your First Pharmacy Qualification: D.Pharm./B.Pharm. Year of Passing:
(Applicable for those who have passed D.Pharm./B.Pharm.)

Please mark ✓ for your current class: I □ II □ III □ IV □ of D.Pharm./B.Pharm.
(Applicable for students of D.Pharm./B.Pharm.)

Name of College & Address :

Higher/Additional Qualification:

Present Job /Activity and Address :

Residential Address:

E-Mail: Mobile No.: Tel.No.:

I enclose a cheque /D.D.no. drawn on
in favour of **MAHARASHTRA PHARMACIST ASSOCIATION**
Note: Membership fee is Rs. 1000/- for pharmacist & Rs.500/- for student.

Date: Signature:

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com